मुख्यमंत्री सचिवालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक 9/12/2022

लिपिक
मंत्री
शालेय शिक्षण व मराठी भाषा
यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

नितीन रमेश दळवी,
१३२/बी, २/९, दामोदर हरिदास बिल्डिंग,
टी एच कटारिया मार्ग, माहीम,
मुंबई ४०००१६
फोन-९९८७४२२३५९

प्रति,
मा. सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई.

09/12/2022

**विषय-"जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षणाधिकारी श्री देविदास महाजन यांनी मोठ्या प्रमाणावर केलेल्या भ्रष्टाचार सन २०२१ हिवाळी अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र ३१ ची पूर्तता करताना अहवाल सादर करण्यामध्ये शिक्षण आयुक्त पुणे श्री सुरज मांढरे (भा.प्र.से ) यांनी जाणीवपूर्वक केलेल्या दिरंगाई प्रकरणी पुणे शिक्षण आयुक्तांवर भा.प्र.से च्या प्रचलित नियमानुसार जाणीवपूर्वक कर्तव्यकसूरता केल्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत"**

**संदर्भ-**
१) माहीतीच्या अधीकारा अंतर्गत महाराष्ट्र विधिमंडळ यांनी दि १०/०५/२०२२ रोजी पाठविलेले पाठविलेले पत्र क्र ९७६४/म.वि.स./विपआस व त्या सोबत संलग्न, विधानपरिषदेतील दिलेल्या आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीसंबंधी विवरणपत्र सन २०२१ चे तिसरे हिवाळी अधिवेशन आश्वासन क्र ३१. ( पानें संलग्न ४)

२)शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भ क्र १ आश्वासनावरील कारवाई साठी अहवाल सादर करण्यासाठी आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांना पाठविलेले ७ वे स्मरण पत्र दिनांक १६/११/२०२२ क्रमांक : विपआ-२०२२/प्र . क्र . २३/प्रशा-३ (प्रत संलग्न पाने १)

**माननीय महोदय,**

विषयांकित व संदर्भीय मुद्द्या अनुसार मी **नितीन रमेश दळवी** खालील नमूद मुद्द्यानुसार पुणे शिक्षण आयुक्त श्री सुरज मांढरे (भा.प्र.से ) यांनी जाणीवपूर्वक केलेल्या दिरंगाई प्रकरणी पुणे शिक्षण आयुक्तांवर भा.प्र.से च्या प्रचलित नियमानुसार जाणीवपूर्वक कर्तव्यकसूरता केल्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करीत आहे.

१)संदर्भ क्र १ अनुसार सन २०२१ चे तिसरे हिवाळी अधिवेशन आश्वासन क्र ३१ अनुसार जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षणाधिकारी श्री देविदास महाजन यांनी केलेल्या मोठ्याप्रमाणावर भ्रष्टाचारप्रकारणी श्री महाजन यांना अंतिम चौकशीअंती सेवेतून बडतर्क केले जाईल आणि आर्थिक गुन्हे शाखेकडे हे प्रकरण पाठविले जाईल असे आश्वासन तत्कालीन मा. शिक्षण राज्यमंत्री श्री बच्चु कडू यांनी दिले होते.

२) विधिमंडळात मा. मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता ९० दिवसात करणे सरकारला बंधनकारक आहे, पण या म्हणजे संदर्भ क्र १ मधील आश्वासनाची पूर्तता ११ महिने उलटूनही झालेली नाही.

३)संदर्भ क्र २ अनुसार शालेय शिक्षण विभागाने शिक्षण आयुक्त पुणे यांना संदर्भ क्र १ ची पूर्तता करण्यासाठी दि ०९/०२/२०२२, १८/०४/२०२२, १७/०५/२०२२,०८/०६/२०२२, २३/०६/२०२२,२२/०७/२०२२, ३१/१०/२०२२ रोजी आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी अहवाल सादर करण्यासाठी वारंवार स्मरणपत्रे पाठविली व संदर्भ क्र २ मधील पत्र हे ७ वे स्मरण पत्र आहे, या वरून असे स्पष्ट होते कि शिक्षण आयुक्त पुणे श्री सुरज मांढरे (भा.प्र.से) यांनी अहवाल सादर करण्यास अत्यंत दिरंगाई केलेली आहे.

४)संदर्भ क्र २ वरून असे निदर्शनास येते कि आश्वासन पूर्ती साठी लागणाऱ्या अहवालामध्ये शासनाचे महसुली नुकसान झाले आहे आणि महसुली नुकसानाचे आकडे हे शिक्षण आयुक्त पुणे श्री सुरज मांढरे (भा.प्र.से) यांनी अहवाल सादर केल्यावरच शासनाला समजू शकतात, पण आजतायागत अहवाल सादर केला गेलेला नाही व आयुक्त पुणे श्री सुरज मांढरे (भा.प्र.से) यांनी सरकारी सेवेची अंमलबजावणी करताना अक्षम्य दिरंगाई केलेली आहे. शासनाचे महसुली नुकसान म्हणजेच जनतेचे नुकसान या घोटाळ्यात झाले आहे.

५)विधिमंडळात मा. मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता ९० दिवसात करणे सरकारला बंधनकारक आहे, पण या म्हणजे संदर्भ क्र १ मधील आश्वासनाची पूर्तता ११ महिने उलटूनही झालेली नाही, याला कारणीभूत शिक्षण आयुक्त पुणे श्री सुरज मांढरे (भा.प्र.से) यांनी अहवाल सादर न करणे हेच आहे.

६)एखाद्या मंत्र्याने विधान परिषदेत केलेल्या आश्वासनाची पूर्तता करताना शिक्षण आयुक्त पुणे श्री सुरज मांढरे (भा.प्र.से) यांनी कर्तव्यकसूरता केली आहे.

**वरील विषयांकित मुद्दा, संदर्भीय मुद्दे व वरील ६ मुद्द्यावरून असे स्पष्ट होते कि भ्रष्टाचारी अधिकाऱ्याला पाठीशी घालण्यासाठी शिक्षण आयुक्त पुणे श्री सुरज मांढरे (भा.प्र.से) हे जाणीवपूर्वक अहवाल सादर करण्यास दिरंगाई करीत आहेत, मंत्र्यांनी विधान परिषदेत दिलेल्या आश्वासनाला शिक्षण आयुक्त पुणे श्री सुरज मांढरे (भा.प्र.से) हे जुमानत नाही, शासनाचे झालेल्या महसुली नुकसानाचा आकडा शिक्षण आयुक्त पुणे श्री सुरज मांढरे (भा.प्र.से) अहवालाद्वारे देत नाहीत म्हणजेच हे सर्व भ्रष्टाचाराचे प्रकरण दाबायचा प्रयत्न करीत आहे.**

**माझी एक दक्ष नागरिक म्हणून मागणी आहे कि शिक्षण आयुक्त पुणे श्री सुरज मांढरे (भा.प्र.से) यांची या भ्रष्टाचाराचा अहवाल सादर करण्यामध्ये कर्तव्यकसूरता करणे, जाणीवपूर्वक दप्तर दिरंगाई करणे, भ्रष्टाचार दाबण्याचा प्रयत्न करणे या संदर्भात त्यांच्या वर भा.प्र.से च्या प्रचलित नियमानुसार कारवाई करावी व अजून दिरंगाई न करता ३० दिवसांच्या आत अहवाल सादर करून संदर्भ क्र १ मधील आश्वासनाची पूर्तता करून घ्यावी.**

**या आश्वासनाच्या पूर्ततेसाठी मी वेळो वेळी पाठपुरावा करत आहे पण अजून या भ्रष्टाचाराच्या आश्वासन पूर्तीची कारवाई पूर्ण होत नाही. आपण नोंद घ्यावी पाठपुराव्याची पूर्ण प्रक्रिया पूर्ण होऊन सुद्धा आश्वासनाची पूर्तता झाली नाही तर या प्रकरणाची याचिका माननीय उच्च न्यायालयात दाखल केली जाईल व याला सर्वस्व पणे जबाबदार आपण सर्व असाल. केलेली कारवाई कळवावी.**

आपला विश्वासू

(नितीन रमेश दळवी)
दि:०८/१२/२०२२
ठिकाण: मुंबई

प्रत कारवाई साठी-
१)मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय.
२)मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३)मा. मुख्य (प्रधान सचिव), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४)मा. सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

**प्रत संलग्न- संदर्भ क्र १ व २ मधील नमूद प्रति एकूण पाने ४.**

विधान भवन
बॅकबे रेक्लमेशन
विधान भवन मार्ग
मुंबई ४०० ०३२

तारेचा पत्ता : विधानमंडळ
दूरध्वनी क्र. : २२०२ ७३ ९९
फॅक्स क्रमांक : २२०२ ४५ २४

# महाराष्ट्र विधानमंडळ

क्रमांक ९८६४ /म.वि.स./ विपआ४
दिनांक 10 MAY 2023

प्रेषक :

प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति :

श्री. नितीन रमेश दळवी,
१३२/बी, २/९, दामोदर हरिदास बिल्डींग,
टी.एच. कटारिया मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६

**विषय : माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये केलेल्या माहितीची मागणी...**
**संदर्भ : आपला माहितीचा अधिकार अधिनियम २००५, अन्वये दिनांक २२ एप्रिल, २०२२ रोजी या सचिवालयास प्राप्त झालेला अर्ज.**

महोदय,

उपरोक्त विषयांकीत संदर्भाधीन अर्जाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपण आपल्या अर्जात मागितलेल्या **मुद्दा क्रमांक (१)** बाबत संदर्भाधीन पत्रावर आश्वासन समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांनी केलेल्या कारवाईची माहिती व कागदपत्रांच्या प्रती सत्यापित करुन पाठविण्याबाबत कळविले आहे. परंतु एखाद्या खाजगी व अनाहूत किंवा त्रयस्थ व्यक्तींनी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्याची या सचिवालयाची प्रथा नाही. त्यामुळे सदरहू पत्रादर या सचिवालयाकडून कोणतीही कार्यवाही करणे अपेक्षित नसल्यामुळे सदरहू पत्र मा. पिठासीन अधिकारी यांच्या निदेशानुसार दप्तरदाखल करण्यात आले आहे. त्यामुळे सदर माहिती **"निरंक"** समजण्यात यावी.

तसेच **मुद्दा क्रमांक २ व मुद्दा क्रमांक ३ बाबत** असे कळविण्यात येते की, विधानपरिषद आश्वासन समिती ही महाराष्ट्र विधानपरिषद नियम, २२० नुसार विधानपरिषद सभागृहामध्ये मा.मंत्री/राज्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनांवर मंत्रालयीन विभागाकडून प्राप्त झालेल्या कार्यवाहीच्या विवरणपत्रावर चर्चा व विचारविनिमय करुन आश्वासनांची पूर्तता करण्याचे काम

..२/-

करते. त्यामुळे अर्जाद्वारे आपण मागितलेली माहिती या सचिवालयातील विधानपरिषद आश्वासन समितीकडून देणे शक्य होणार नाही. आपणास मुद्दा क्रमांक २ व ३ संदर्भात हवी असलेली माहिती संबंधित मंत्रालयीन विभागाकडून प्राप्त होऊ शकते. सबब, आपणास **महाराष्ट्र विधानपरिषद नियम २२० ची प्रत** व **सन २०२१ च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनातील मा. राज्यमंत्री, श्री. बच्चु कडू यांनी दिलेले आश्वासन क्रमांक ३१ च्या विवरणपत्राची प्रत** या पत्रासोबत पाठविण्यात येत आहेत.

सदरहू माहितीने आपले समाधान न झाल्यास, आपण **श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव तथा अपिलीय प्राधिकारी,** महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ११ वा मजला, कक्ष क्र. ११०४-ब, विधान भवन मुंबई-३२ यांच्याकडे विहित मुदतीत अपिल करु शकता.

आपली,

जयम्हात्रे

**(जयश्री म्हात्रे)**
कक्ष अधिकारी तथा माहिती अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

विधानपरिषदेने दिलेल्या आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीसंबंधी विवरणपत्र
सन २०२१ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

विभागाचा फाईल क्र : ..................................

विभागाचे नाव : (शालेय शिक्षण) व क्रीडा विभाग

| आश्वासन क्रमांक | संदर्भ व दिनांक | विषय | आश्वासन | आश्वासन पूर्तीबाबत करण्यात आलेली कारवाई | आश्वासन कधी पूर्ण करण्यात आले, त्याबाबत चे आदेश, निर्णय असल्यास त्याचा दिनांक (प्रत सोबत जोडावी) | आश्वासनाची पूर्ती केल्याचा दिनांक | आश्वासनपूर्ती करण्यासाठी लागलेल्या विलंबाचा कालावधी | आश्वासनपूर्ती करण्यासाठी विलंब लागल्याची कारणे | विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर केलेली कारवाई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| ३१ | विधानपरिषद आश्वासन खंड : [illegible] [illegible] दिनांक : [illegible].२०२१ माननीय मंत्री / : राज्यमंत्री श्री. यांनी दिलले उत्तर | जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षणाधिकार यांनी मोठ्या प्रमाणावर केलेला भ्रष्टाचार. श्री किशोर दराडे.वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्र.३४६ | **मा. राज्यमंत्री / श्री. बच्चु कडू :-** शिक्षणाधिकारी यांना पुन्हा सेवेत घेतले असेल तर त्यांना सेवेतून काढले जाईल. अंतिम चौकशीअंती निलंबन ऐवजी सेवेतून बडतर्फ केले जाईल. एवढेच नव्हेतर आर्थिक गुन्हे शाखेकडे हे प्रकरण पाठविले जाईल. | | | | | | |

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४१५,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

गोपनिय /स्मरणपत्र क्र.७
विधानमंडळ काजकाज/कालमर्यादा

ई-मेल:-adm3.sesd-mh@gov.in

दिनांक : १६ नोव्हेंबर, २०२२

क्रमांक : विपआ-२०२२/प्र.क्र.२३/प्रशा-३

प्रति,

आयुक्त (शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, पुणे

विषयः सन २०२१ च्या हिवाळी अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र. ३१
जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी मोठ्या प्रमाणावर
केलेल्या भ्रष्टाचारबाबत....

संदर्भः-१. शासनाचे समक्रमांकाचे दि.९ फेब्रुवारी, २०२२ चे पत्र व दि.१८/०४/२०२२,
दि.१७/०५/२०२२, दि.०८/०६/२०२२, दि.२३/०६/२०२२, दि.२२.०७.२०२२ व
दि.३१.१०.२०२२ ची स्मरणपत्रे.
२.आपले क्र. आस्था अ-१०३/नाविना/बच्छाव/६४३४, दि.०३/११/२०२२ चे पत्र.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी आपल्या संदर्भिय क्र. २ येथील पत्रान्वये शिक्षणाधिकारी (माध्य.), जि. प. जळगाव येथील सन २०१५ ते २०१९ या कालावधीतील वैयक्तिक मान्यता प्रकरणातील दोषींविरुद्ध तत्कालीन मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांनी दिलेल्या आश्वासन क्र.३१ ला अनुसरुन माध्यमिक शिक्षण संचालनालयाने दि.११/०५/२०२२ च्या तीन पत्रांन्वये आपणास सादर केलेल्या अहवालासोबत पुरावापत्रे सादर केली नसल्याने पुरावापत्रे प्राप्त करुन घेण्याकरीता शिक्षण उपसंचालक, नाशिक यांच्याशी संपर्क साधला असून याप्रकरणी अनियमित वैयक्तिक मान्यताप्रकरणी शासन परिपत्रक दि.२३/०८/२०१७ (आपल्या पत्रात नमूद दि.२३/०८/२०२२) अन्वये सुनावणी घेवून अनियमित वैयक्तिक मान्यता रद्द झाल्यानंतर, त्यानुषंगाने पडलेल्या आर्थिक भारासह व आवश्यक पुरावापत्रासह परिपुर्ण शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक यांना सूचना दिल्याचे निदर्शनास येते.

सदर विधानमंडळ आश्वासनाची पुर्तता ९० दिवसांत पुर्ण करणे बंधनकारक आहे. तथापि १० महिन्यांपेक्षा अधिक कालावधी होवूनही प्रस्तुत प्रकरणाचा परिपुर्ण अहवाल शासनास अद्यापी प्राप्त झालेला नाही. तरी या बाबीची नोंद घेऊन याप्रकरणी आवश्यक कार्यवाही तातडीने पुर्ण करुन त्याबाबतचा परिपुर्ण अहवाल शासनास दि.२१.११.२०२२ पूर्वी न चुकता सादर करावा.

निर्गमित
दिनांक १६/११/२०२२
लिपिकाची स्वाक्षरी

(किसनराव पलांडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन